किंमत ४० रूपये
वर्ष-१, अंक-११, फेब्रुवारी २०१५

# ॲग्रोवर्ल्ड

ध्यास.. कृषी व ग्रामविकासाचा



ग्रामविकास विशेष

# देशभरातील ग्रामविकासाच्या नवख्या संकल्पना

यशोगाथा

- गोबरगॅस ठरला देवगावचा श्वास
- मानमोडीने रचला आदर्शगावाचा पाया
- युवा सरपंचाने केला गावाचा कायापालट
- 'वॉटर बँकां'मुळे शेतकरी मालामाल
- विकासाच्या वाटेवर निघाली राष्ट्रसंतांची अन् शहिदांची 'यावली'

गोगलगावात स्वच्छतेसाठी 'हिरागिरी'

ग्रामबिजोत्पादनाने बाळखेडाला विकासाची दिशा

मान्यवरांच्या अनुभवांवर आधारित लेख

ना. पंकजा मुंडे-पालवे, पद्मश्री डॉ. भवरलाल जैन, पद्मश्री ना. धो. महानोर, पोपटराव पवार, विजयाताई पाटील, आ. हर्षवर्धन सपकाळ, रामचंद्र हणवर-देशमुख, योगेश थोरात



पूर्वी अरुंद असलेल्या रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला आहे.

# गावाचे चित्र बदलण्यासाठी सर्वच स्तरातून प्रयत्न हवेत!

**ब्रिटिश काळामध्ये व त्याआधी मोघल राज्यामध्ये भारत हा श्रीमंत खेड्यांचा देश म्हणून पुढे राहिला आहे. आज मात्र स्वातंत्र्याची साठी उलटल्यानंतरही खेडी, मात्र गरीब झाली व शहरी विकासाच्या आधाराने भारत श्रीमंत झाला. म्हणजेच 'श्रीमंत खेड्यांचा गरीब भारत'हे समीकरण बदलून 'गरीब खेड्यांचा श्रीमंत भारत' असे समीकरण तयार झाले. आजही असंख्य खेड्यातल्या मागासलेपणाचे चित्र मोठे विदारक आहे. ग्रामीण भागातील हे चित्र बदलण्यासाठी सर्वच स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहेत.**



**भवरलाल जैन, अध्यक्ष,**
**जैन इरिगेशन सिस्टिम्स, जळगाव**

ग्राम विकासासाठी सरकारच्या योजना नाहीत, असे नाही. किंबहुना यासाठी बळ देणारे कोणी समाजसुधारक, मार्गदर्शक होऊन गेले नाहीत, असेही नाही. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज आदींनी समाज सुधारणेसाठी, ग्रामविकासासाठी दिलेले मंत्र आजही गावोगावी घुमताहेत. असे असूनही खेड्यातले बकालपण आहे तसेच आहे. उलट स्वातंत्र्याच्या साठीनंतर तर यातील पोक्तपणा, शहर आणि खेड्यातील अंतर आणखी वाढताना दिसते आहे. हे गाव, माझे गाव आहे असे समजून आत्मीयता असणारी माणसेही हळूहळू कमी होत चालली आहेत. गावाप्रती आस्था असणारे लोक जर गावात नसतील तर त्या गावाची सुधारणा करणार कशी, असा मूलभूत प्रश्न निर्माण झाला आहे.

दिवसेंदिवस वाढत गेलेली लोकसंख्या व निसर्गाच्या विविध आव्हानांमुळे कमी झालेले कृषी उत्पादन यामुळे आजच्या घडीला अन्न सुरक्षिततेबाबत गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. हे जर आपण तातडीने बदलू शकलो नाही तर असंतोष व अनर्थ ओढवेल. शासनाने बऱ्याच अंशी सत्तेचे विकेंद्रीकरण केले आहे. सत्तेबरोबर निधीच्या वाटपाचेही विकेंद्रीकरण झाले आहे. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री (स्व.) यशवंतराव चव्हाण यांच्या पुढाकारातून साकारलेल्या

# शासनाधार हेच ध्येय असू नये

आजपर्यंत सबळ कारणासाठी शासनाने ज्या काही योजना ग्रामीण विकासासाठी राबविल्या त्यात कापूस, केळी, ऊस, भाजीपाला, तेलबिया अशा नगदी पिकांवर अधिक भर दिला जातो. यामुळे शेतीत सर्वच शेतकरी यशस्वी झाले असे नाही. ज्या शेतकऱ्याजवळ पाणी होते किंवा ज्यांना सिंचनाच्या व्यवस्थेचा फायदा झाला असे शेतकरी बऱ्याच अंशी संपन्न झाले, परंतु या परिस्थितीमुळे धान्याचे दरडोई उत्पादन सातत्याने कमी होत राहिले, घसरत राहिले. ही परिस्थिती बदलावयाची असल्यास शासनाने व परिणामतः गावातील प्रतिनिधींनी कोरडवाहू शेतीकडे लक्ष केंद्रित करणे ही काळाची गरज आहे. कोरडवाहू शेतीसाठी शेततळे व त्यासाठी सौरऊर्जा व ठिबक सिंचन अशा अनुभवसिद्ध योजनांना राबविणे व्यवहार्य तर आहेच शिवाय ती काळाची गरजही आहे.

गांधीजी म्हणायचे, स्वातंत्र्यपूर्व काळातसुद्धा आपली शेती आणि आपला शेतकरी इंग्रजांच्या शेती व शेतक–यांपेक्षा कितीतरी पुढे होता, सबळ होता, जिज्ञासू होता. नवनवीन प्रयोग करण्याची जिद्द व हिम्मत त्याच्या ठायी होती, तो आत्मविश्वासू होता. आता 'शासनाधार हेच त्याचे ध्येय झाले आहे. ही प्रवृत्ती ग्रामीण भारताच्या विकासात एक फार मोठी खीळ म्हणून पुढे येत आहे.'

गावकऱ्यांनी सुधारणा करायच्याच ठरवल्या तर काय होऊ शकते याचे उत्तम दाखले काही गावांच्या माध्यमातून पुढे आले आहेत. अशा वैशिष्ट्यपूर्ण गावकामांच्या अनुभवावरून सरकारी यंत्रणेने आपल्या विविध योजनेत बदल केले. या बदलांचा लाभ मात्र सर्वच गावांना घेता आला नाही. लोकसहभागच जर नसेल तर योजना कितीही चांगल्या असल्या तरी त्यातून काही साध्य होत नाही, हे पुन्हा या निमित्ताने समोर येते. लोकांचाच सहभाग नसल्याने ग्रामविकासाचा ताळेबंद प्रत्यक्ष खेड्यात नाही तर सरकारी दप्तरावर उतारला गेल्याची अनेक उदाहरणे असू शकतात. अशावेळी सरकार नव्हे तर याला आपण जनताजनार्दन जबाबदार आहोत ही जाणीव होणे महत्त्वाचे ठरते.

सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे ग्रामीण भागाला एक नवे शक्तिस्थळ प्राप्त झाले. ग्रामीण भागाच्या विकासासाठी सत्तेचे हे विकेंद्रीकरण अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल असा आशावाद त्याकाळी होता. कालांतराने यात आणखी सुधारणा होत खऱ्या अर्थाने ग्रामविकासाच्या सर्व संकल्पना ठरविण्याचे अधिकार ग्रामसभेला प्राप्त झाले. गावाचा प्रमुख म्हणून लोकशाही मार्गाने ज्याची निवड होते तो प्रतिनिधी इतर शक्तीस्थळापेक्षा विकासाचे शक्तिस्थळ होणे संपूर्ण खेड्यांच्या दृष्टीने जास्त महत्त्वाचे असते.

गावाच्या विकासामध्ये गाव प्रतिनिधींची भूमिका महत्त्वपूर्ण व ठाशीव असते. सुदैवाने आता या भूमिकेला युवाशक्तीची जोड मिळाली आहे. ग्रामविकासाच्या प्रक्रियेत लोकसहभागाचे बळ असेल तर त्याला लोकाभिमुकतेचा चेहराही मिळतो. गावाची प्रगती साधण्यासाठी, गावाला विकासाच्या वाटेवर नेण्यासाठी गावाचे प्रतिनिधित्व करणा–या प्रतिनिधींना दूरदृष्टी असणे आवश्यक असते. विकासाच्या प्रक्रियेमध्ये नैसर्गिक साधन संपत्तीचे व्यवस्थापन संजीवक असते. गावाच्या गावठाणात ओहळ, नदीनाले, ओढे, जमिनीचे





बाजार ओटे झाल्याने असा टापटीपपणा आला

चढउतार किती आहेत, त्यात किती महिने पाणी असते, त्याचा परिसरातील विहिरींवर काय परिणाम होतो, वनसंपदा किती हे जे ओळखतात ते त्याच्या नियोजनामागे लागतात. या दूरदृष्टिसाठी व प्रशिक्षणासाठी शासकीय पातळीवर विविध संस्था कार्यरत असतात. शासनाच्या विविध योजना ग्रामविकासासाठी आहेत. यात महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमिसंधारण अभियान, नरेगा, स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, इंदिरा आवास योजना, संपूर्ण स्वच्छता अभियान, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना, इंटिग्रेटेड वॉटर शेड मॅनेजमेंट प्रोग्राम, इको व्हिलेज, समाजमंदिर, वस्तीशाळा, अंगणवाडी अशा कित्येक योजना आज खेडयांसाठी उपलब्ध आहेत. अशा योजनांचा, उपक्रमांचा ओघ आपल्या गावाकडे वळविणे हे सज्जनशक्तीचे सदस्य, परिश्रमी व उद्यमी प्रतिनिधींना सहज शक्य असते. यासर्व योजना निःपक्षपणे, कोणताही लाभ-लोभ न ठेवता कार्यान्वित ठेवणे हे खरे आव्हान असते.

## तर विकासाचे पर्व सुरु होईल

गावातील प्रतिनिधी निःस्वार्थी, निर्भीड आणि पारदर्शी काम करणार असतील तर ख-या अर्थाने विकासाचे पर्व गावागावात सुरू होईल. शासकीय योजना या सर्वांसाठी असतात. कारण शासन हे सगळ्यांचे प्रतिनिधित्व करीत असते. गावातील पक्षीय राजकारणाला निवडणुकांपुरते महत्त्व असले पाहिजे. निवडणुका झाल्यानंतर विनाकारण घराघरामध्ये, गल्ली-गल्लीमध्ये पक्षीय राजकारणाच्या फायद्यासाठी संगत निर्माण करणे ग्रामविकासाचे, सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे ध्येय असता कामा नये. निवड झाल्यानंतर गावाचे प्रतिनिधित्व आपण करीत असल्याचे भान तिथल्या प्रतिनिधींना असले पाहिजे. निव्वळ आपल्या पक्षापुरता दृष्टिकोन ठेवला तर गावातील विकास प्रक्रियेत सातत्याने अडथळे निर्माण होतात. पक्षातीत कारभार करावयाचा ठरल्यास विकासाचा वेग किमान दुप्पट होऊ शकतो. निःस्वार्थपणे, उच्च दर्जाचे काम करावयाचे ठरल्यास हाच वेग आणखी दुपटीने वाढू शकतो. अर्थातच या सर्व कारभारात



पूर्वी अरुंद  असलेला रस्ता.



गावात उभे राहलेले आरोग्य केंद्र



विद्यालय

गावाचा सहभाग गृहीत धरला आहे आणि ती एक मोठी उणीव व आव्हान आहे. काही कारणाने का असेना गाव-खेड्यात सार्वजनिक कामांबद्दल कमालीची उदासीनता आढळते. पाणीपट्टी, घरपट्टी, दिवापट्टी असल्या मूलभूत बाबींकडे गांभीर्याने बघितले जात नाही. त्यासाठी ख-या अर्थाने जनप्रबोधनाची आवश्यकता असते. या बाबतीत काही अंशी शासनालासुद्धा जबाबदार धरावे लागेल. निवडणुकीपूर्वी जन-सामान्यांना विविध आश्वासने दिली जातात. त्यामुळे आळस, उद्यमहीनता, परिश्रम न करता निव्वळ गप्पागोष्टी, नारेबाजी, दांडगटशाही करून आपले सगळे भागेल असला भ्रम ग्रामस्थांठायी निर्माण होतो. आज आपण पाहतो की, शेतीकामासाठी बाई-माणूस मिळणे कठीण झाले आहे.

### जन्मगावाप्रती असलेल्या कृतज्ञतेतून झाली कामे

अजिंठ्याच्या पायथ्याशी असलेले माझे जन्मगाव वाकोद. असंख्य खेड्यांपैकी एक गाव आहे. काही लोक म्हणतात व्यावसायिक जीवनात स्थिरस्थावर झाल्यानंतर तसे पाहता भाऊंना पुन्हा गावाकडे परतण्याची गरज नव्हती. परंतु, जन्मगावाप्रती कृतज्ञता होती, त्या कृतज्ञतेने स्वस्थ बसू दिले नाही. ज्या गावात आपण वाढलो, घडलो त्या गावासाठी काही करणे ही आपली जबाबदारी आहे. या नैतिक भूमिकेतून वाकोद ग्रामविकास प्रकल्पाची रूपरेषा आखली. बदलत्या राजकीय संदर्भानुसार आज खेड्यापाड्यात निर्माण झालेल्या गटबाजीसारख्या प्रकारात वाकोद

जिल्हा परिषद शाळेची इमारत.





गावचा आठवडी बाजार

गावदेखील अपवाद नव्हते. या विकास प्रकल्पाच्या सुरवातीला गावातील गटबाजी थोपविणे आव्हानात्मक होते. ग्रामविकासाची सुरवात करताना ग्रामस्थांनी जर आपल्या गावाकडे आत्मीयतेने पाहिले तर गावाचा कायापालट झाल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास गावकऱ्यांमध्ये निर्माण केला. संघटन, जनजागृती व लोक प्रबोधनावर भर दिला. पायाभूत सुविधा असल्याशिवाय इतर विकास योजना राबवून चालणार नाही याची कल्पना होती. सरकारी योजनांचा लाभ गावाला मिळवून देत रस्ते, शौचालय, समाजमंदिर, अंगणवाडी, प्राथमिक-माध्यमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, शेती विकास यावर भर दिला.

जैन चॅरिटीजच्या माध्यमातून तब्बल दोन कोटी २२ लाख ३० हजाराची अतिरिक्त रक्कम ग्रामविकासाच्या कामासाठी उपलब्ध करून दिली. आपल्या गावात होणारी पायाभूत सुविधेची कामे दीर्घकाळ टिकली पाहिजे ही भूमिका घेतल्याने वाकोदमध्ये झालेली पायाभूत कामे आदर्श ठरली आहेत. आपण जे काही करीत आहोत त्याचा लेखाजोखा सर्वांपर्यंत पोहोचला पाहिजे या उद्देशाने ग्रामसभेत वेळोवेळी संबंधित माहिती सादर करण्याची दक्षता घेतली. जैन चॅरिटीजच्या माध्यमातून दीर्घकाळ टिकणारी कामे होऊ शकतात याचा प्रत्यय वाकोद विकास प्रकल्पाद्वारे गावकऱ्यांना आला.

शासकीय योजना व त्यात जैन चॅरिटीजची भर, कंत्राटदारांकडे कामे देण्यापेक्षा ग्रामपंचायतीनेच पालकत्त्वाच्या भूमिकेतून कामे करणे याचा पाया वाकोद प्रकल्पाद्वारे रचला गेला. एक अतिशय महत्त्वाची बाब म्हणजे महिलाच खऱ्या अर्थाने घर चालवितात. त्यामुळे ग्रामपंचायतीचा कारभार पूर्णतः महिलांच्या हातात देण्यासाठी सकारात्मक प्रयत्न केला. वाकोदवासियांच्या सहकार्याने हे परिवर्तनाचे काम अधिकाधिक गतीमान झाले.

## शेती सुधारली तर गाव सुधारेल

शेती सुधारली तर गाव सुधारण्यास वेळ लागणार नाही हे लक्षात घेऊन बांबू, साग, सिताफळ लागवडीचा कृषी आराखडा तयार करून घेतला. शेती विकासाचे प्रयोग स्वत:च्या शेतीवर केले. मोकाट पाण्याच्या वापरामुळे होणारे पाण्याचे नुकसान टाळण्यासाठी शेतक-यांना परवडणारी प्लास्टिक पाइपची निर्मिती केली. पाण्याचा काटकसरीने वापर व्हावा, कमी पाण्यावर जास्तीत जास्त उत्पादन घेता यावे यासाठी ठिबक सिंचनपद्धतीचा प्रत्यक्षात वापर केला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासह गुणवत्तापूर्ण शाळा, महाविद्यालयाची निर्मिती, गुणवंतांना प्रोत्साहन देण्यासाठी पुरस्कार, शिष्यवृत्ती, वसतिगृह, ग्रंथालय, प्रयोगशाळांची निर्मिती, संशोधन, प्रकाशन यावर भर देण्याचा उद्देश यामागे आहे. आरोग्याच्या दृष्टीने गरजू रुग्णांना मदत, हॉस्पिटलची निर्मिती, सार्वजनिक आरोग्यासाठी जागृती, अपंगांना मदत अशा अनेक महत्त्वपूर्ण बाबींचा कृतिशील ध्यास आहे. शेती, जलसंधारण, महिला सक्षमीकरण, शिक्षण, लोकसंघटन, युवकातील क्रीडागुणांना चालना, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम, ग्रामविकासाच्या पायाभूत योजनांवर भर याला प्राधान्य देण्यात येतेच.

महात्मा गांधीजींच्या ग्रामविकासाबाबतीतला खरा अन्वयार्थ समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. ग्रामविकासासाठी गावकऱ्यांनी एकत्र येणे गरजेचे आहे. शासनाच्या विविध योजना आपल्या गावात राबविल्या जाव्यात यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. लोकसहभागच जर नसेल तर योजना कितीही चांगल्या असल्या तरी त्यातून काही साध्य होत नसते. जन्मापासून मृत्युपर्यंत सर्वकाही शासनाने केले पाहिजे असे वाटत असेल तर नागरिक करणार तरी काय ? हाही एक मोठा गंभीर प्रश्न आहे. शासकीय योजनांचा लाभ घेऊच नये असेही नाही; मात्र त्या मार्गाने काही अनिष्टबाबी गावात शिरू नयेत, याची डोळ्यात तेल घालून काळजी घ्यावी. गावक-यांची स्पष्ट संमती असल्याखेरीज, ग्रामपंचायतीचा आर्थिक सहभाग असल्याखेरीज कोणतेही काम सुरू करु नये. वशिलेबाजी, नेतेगिरी, खाबूगिरी, लाचखोरी या दुर्गुणांना मुळीच स्थान नसावे. ग्रामपंचायतीपासून राजकारण, राजकीय नेते विघातकतेने जोडले गेले की अनेक अडचणींचा डोंगर तयार होतो. ग्रामविकास संकल्पना राबविताना शासकीय व ग्रामस्तरावर अशा अनेक अडचणी निर्माण होत असतात. प्रत्येक अडचणीवर मार्ग शोधला तर नक्कीच सापडत असतो. शेतीच्या बाबतीत सांगायचे झाले तर जलसंधारण, गरजेप्रमाणे वीज, पाण्याचा नियोजनबद्ध वापर, शाश्वत शेतीसाठी लागणारे सेंद्रिय खत, पीक पद्धतीत बदल याकडे लक्ष वेधून ग्रामस्थांना त्याबद्दल सजग व साक्षर करणे ग्राम विकासाची खरी गुरुकिल्ली आहे.